ग्रं.
म. ग्रं. सं. ठाणें
वि. ८ काव्य.
सं. ८२६
नों. १००६

नोंदणी
३४०

REFBK-0000334
REFBK-0000334

सं. ठाणें

काशीनाथ त्रिंबक तेलंग

यांचें

# पद्यात्मक चरित्र.

देवाचे गुण गाण्याचा अधिकार ॥ मनुष्यमात्रास आहे जर ॥
स्वदेश लोकनायकांचा बडिवार ॥ अवश्य आह्मी गावयाचा ॥

हें

दामोदर फटुबा भांडारे

यांनीं रचिलें.

मुंबईंत,

'कर्नाटक' छापखान्यांत छापिलें.

सन १९०६.

नामदार न्यायमूर्ति काशीनाथ त्रिंबक तेलंग.



## In honor of Telang's 13th Anniversary.

We honor him because, he was at the end of the Nineteenth century, the best exponent of a noble spirituality and great and glorious idea of United India.

# नमस्कार विनंती.

मी कोण, आलों कोठून, केलें काय, करतों काय, करणार काय, व पुढें होणार काय, याचा उलगडा करण्याचा यत्न सर्वांनीं करावा. शहाणे लोक याचा विचार करितात—तरी त्यांची महत्वाकांक्षा अमळ शिथिल असल्यामुळें, गेलें पाहिजे त्या पायरीवर, ते बरोबर पोंहचत नाहींत.—"पात्रता नसतां तेलंगपणा मला झेंपणार नाहीं," असें ह्मणून महत्वाकांक्षा सोडून देणें योग्य नव्हे. "सगळ्यांस थोर होतां येत नाहीं, पण सुशील होतां येतें." अशी एक पोर्तुगीज भाषेंत मला ह्मण आढळली—

"Todos podem ser bons, se naõ grandes."

सारांश, ज्याचें उंच तऱ्हेनें व वऱ्या दिशेनें स्थित्यंतर होतें, त्याचें कारण "महत्वाकांक्षा" हेंच आहे. ती गुणग्राहीपणामुळें आपल्याहून पुष्कळांट अधिक चांगल्या पुरुषाच्या संगतीनें प्राप्त होते.


विषयानंदीं रिघावें पाहिजे तरी खेळावें ॥
परि बंधन कर्तव्य न सोडावें ज्या त्या वेळीं ॥ १ ॥
आपण कोण हें पहावें कित्ता घेण्यास टपावें ॥
आणि त्यापरी चालावें प्रत्येकजणें ॥ २ ॥
एका प्रकारें चांगली स्फुर्ति लोकसेवेची धरुनि आर्ती ॥
जी स्तुत्य वांछारूप ज्योती मालवूनि काय कामाची ? ॥ ३ ॥

**दामोदर फटुबा भांडारी.**

(पत्ता) क्लार्क-राली ब्रदर्स,

REFBK-0000334

REFBK-0000334




ऋग्वेदसं० अष्ट०८ अ०७ वर्ग ११ ऋ० ३
पहा. (राष्ट्री सूक्त.)

THE INDIA LITHO PRESS, BOMBAY

## दुसऱ्या आवृत्तीचे दोन शब्द.

## तेलंग आणि स्वराष्ट्रदेवी-प्राणप्रतिष्ठा.

BE PATRIOT AND DO NOT LOSE YOUR SOUL.

### ओंव्या.

जे सदैव सौभाग्यवती ॥ नित्य नवी तारुण्य युवती ॥ ते अंबा स्वराष्ट्रदेवी भगवती ॥ स्तवितों वंदे मातरम्। ॥१॥ स्वराष्ट्रीयत्वाची शुद्ध कल्पना ॥ दाखविणारा नरराणा ॥ काशीनाथ त्रिंबक तेलंग जाणा॥एकोणिसाव्या शतकांत॥२॥प्रजाधर्माचें माहात्म्य ॥ स्वदेशीं करणें तादात्म्य ॥ प्राचीन पुराणीं ऐसें माहात्म्य ॥ जाणविलेंचि नाहीं ॥३॥ स्वराष्ट्र ह्मणजे काय ॥ परराष्ट्र ह्मणजे काय ॥ प्रजेनें राजास शिकवावें काय ॥ वेदांत-शास्त्रांत स्पष्ट नसे ॥४॥ हिंदुस्थानदेश आर्यमाता ॥ हीच आमची स्वराष्ट्र देवता॥ इजवांचुनी आह्मांस त्राता ॥ दुजा कोण नाहीं ॥५॥ स्वराष्ट्राचा अभ्युदय ॥ तोच आपला खरा उदय ॥ ही समजूत अक्षय ॥ विसाव्या शतकांत प्रफुल्लित ॥६॥ राष्ट्र-देवीची प्रतिष्ठापना ॥ झाली याच शतकीं जाणा ॥ वास्तुदेवता ग्रामदेवतापणा ॥ राष्ट्रीयत्वीं उदेला ॥७॥ काशीनाथ त्रिंबक तेलंग श्रेष्ठा॥योग्य वाटली ह्मणून निष्ठा॥ स्वराष्ट्रदेवी प्राणप्रतिष्ठा ॥ त्यांनीं आरंभिली ॥८॥ महात्मे तपस्वी योगी करिती॥ तपश्चर्या हिमालयावरती॥ त्यांचें ओजस सामर्थ्य नीति ॥ पाश्चात्य प्रजेंत शिरतसे॥९॥ त्यांचा परकाया प्रवेश योग ॥ युरप अमेरिकेंत घेई उपभोग ॥ वायुगतीं चुकून एखादा ओघ ॥ आर्यजनांत क्वचित शिरे ॥१०॥ त्याच तपश्चर्येचें तेज ॥ तत्वज्ञ राष्ट्रभक्तांत सहज ॥ शिरून होतसे स्वदेशकाज ॥ सृष्टिक्रमें तपसामर्थ्यें ॥ ११ ॥ सुधारणा कर्तव्य राजरोस ॥ तेंच या तपश्चर्येचें ओजस॥ मद्रास बंगाल मुंबईस ॥ राष्ट्रीयत्वें पसरलें ॥१२॥ आतां आमच्या खाणींत हिरे ॥ झाले अशा कालीं योग्य

सारे ॥ महाराष्ट्रीं चमकले दिव्य खरे ॥ तें सांगतों ॥१३॥ तेलंग रानडे भांडारकर॥ पंडित भालचंद्र चंद्रावरकर ॥ स्वधर्मास स्वराष्ट्रीयत्व देती चतुर ॥ तेच हे हिरे खाणींतले ॥ १४ ॥ यांचा रत्नहार करावया जातां ॥ अनेक माणकें लाभती ज्ञाता॥ गोखले इत्यादिकांचीं नांवें लिहितां ॥ विस्तार वाढेल पुढें सांगूं ॥ १५ ॥ नवविधा राष्ट्रभक्ती मध्यें भला ॥ एकाखंडें एक एक तरला ॥ नारद कीर्तनें तरला ॥ अर्जुन सख्यानें ॥ १६ ॥ एकाचें एकास न साधे ॥ भांडारकरचें भाऊ दाजीस न साधे ॥ भालचंद्रांचें शील न साधे ॥ मोठ्या मुत्सद्यालाही ॥ १७ ॥ ऐशालोकांची सहनशीलता ॥ शत्रूचें मर्मभेदी तत्वता ॥ अवेळीं विकारवश न होतां ॥ वेळींच करावें तें करिती ॥ १८ ॥ हे इतके पाणीदार असती ॥ कीं पाण्यानेंच आग विझ-विती ॥ आगींत आग न पाखडिती ॥ चवताळुनी ॥१९॥ हे वरवर जरी दिसले मौनी ॥ आहेत खरेखुरे तत्वज्ञानी ॥ स्वराष्ट्रहिताचा त्यांच्या अंतःकरणीं ॥ पीळ वसला आहे ॥ २० ॥ त्यांच्या राष्ट्रहितांत वेदांत आलें ॥ त्यांच्या राष्ट्रहितांत वैराग्य धालें ॥ त्यांच्या राष्ट्रहितांत मुमुक्षुत्व झालें ॥ खऱ्याशांति समाधानीं ॥ २१ ॥ एक तरला ज्ञानमार्गें ॥ एक तरला भक्तिमार्गें ॥ एक तरला कर्म-मार्गें ॥ परि समान सारखे राष्ट्रभक्त ॥ २२ ॥ अध्यात्मास वेळ थोडा द्यावा ॥ भक्तिज्ञान वैराग्यास द्यावा ॥ थोडा राष्ट्रीयत्वास द्यावा ॥ शेंडी जानवें राखण्यास ॥ २३ ॥ राष्ट्रीयत्वीं अध्यात्म येतें ॥ अध्यात्मांत राष्ट्रीयत्व नसतें ॥ राष्ट्रीयत्वीं ज्ञान वसतें ॥ ज्ञानांत राष्ट्रीयत्व थोडें ॥२४॥ वेदांत आह्मास सर्वांत सोपें ॥ वीतरागें आणि अनुतापें॥पूर्वीं आमचीं मायबापें॥असींच वाढलीं ॥२५॥आजच्या स्थितीस जें पाहिजे आहे ॥ नवे शोध विद्याज्ञान नव्हे आहे ॥ स्वार्थत्याग लक्षण पाहिजे आहे ॥ विदेह मुक्तासारखें ॥२६॥ शूरास जखमेचा आनंद ॥ राष्ट्रभक्तास छळाचा आनंद ॥ निष्कलंकास निंदेचा आनंद ॥ असें राष्ट्रीयत्व पाहिजे ॥२७॥ स्वदेश आणि स्वतंत्रता ॥ या शब्दांचा जयघोष होतां ॥ अंगावर रोमांच उभे राहतां॥ कंठ सद्गदित होतसे ॥२८॥ एकोणिसाव्या शतकांत आले ॥ तीस दुष्काळ चार कोट मेले ॥ या दहा वर्षांत प्लेगनें नेले ॥ सदतीस लाख तरुण असे ॥ २९ ॥ असे पटापट प्राण

३३७ दा. क्र.

सोडिती ॥ राष्ट्रासाठीं थोडेच मरती ॥ शून्यवादें पुष्कळ जाती ॥ ही देशभक्ति काय वरें?! ॥ ३० ॥ या पार्थिव देहाचा भूमीचा ॥ अत्यंत निकट संबंध साचा ॥ भूमीकडे ओढा या देहाचा ॥ स्वाभाविक अन्नामुळें ॥ ३१ ॥ आपल्या हातून कांहीं तरी ॥ कार्य खास होणार निर्धारीं ॥ असा विश्वास ठेवा अंतरीं ॥ सर्व हातीं देवीच्या ॥ ३२ ॥ केव्हां ना केव्हां तरी राष्ट्र एक ॥ आमचें होणार हें निःशंक ॥ न्यायमूर्ति रानडे यांसारखे लोक ॥ बोलून गेले खोटें नव्हे ॥ ३३ ॥ राष्ट्रांत शांतता असल्यानें ॥ प्रजाहित होई देशाभिमानें ॥ तें हितसुधारक समूहानें ॥ चालतां बोलतां सहज केलें ॥ ३४ ॥ तें हित म्हणजे सती जाणे बंद ॥ बालविवाहास प्रतिबंध ॥ स्त्रीशिक्षण सामाजिकसंबंध ॥ एकरूप करून सोडले ॥ ३५ ॥ राजसामर्थ्याचा फायदा घेणें ॥ आणि स्वदेशबंधूंचें कल्याण करणें ॥ बहिष्कारावीण स्वदेशीच घेणें ॥ विशेष चांगलें मर्म पहा ॥ ३६ ॥ तेलंग रानड्यांची हातोटी ॥ अशीच कांहीं होती मोठी ॥ सर भालचंद्रांची हातोटी ॥ अशाच निर्मळ खुबीची ॥ ३७ ॥ राष्ट्रजीविताच्या मर्मस्थानास ॥ शिवतां राजाच्या धरिती हातास ॥ परंतु त्याची गडबड लोकांस ॥ फार दाखवीत नसती ॥३८॥ एखादें असें कडक भाषण होतें ॥ त्यांचें सरकारांत तेज पडतें ॥ उंच कांट्यावरचीं मोत्यें ॥ भारदस्त तोलती ॥३९॥ तेंच भाषण कडक जरी ॥ एखादा साधारण उच्चारी ॥ कैदेंत पडेल सत्वरीं ॥ ऐसें भाषण तयांचें ॥४०॥ देशाभिमान शब्दाची कडक टीका ॥ दादाभाई नौरोजींनीं केली देखा ॥ त्या पितामहास पचून गेली ऐका ॥ तपाचें सामर्थ्य म्हणोनी ॥४१॥ नखशिखांत देशभक्ति भरलेलें भाषण ॥ चंदावरकरांचें पहा नेत्र उघडून ॥ तेंच दुर्बलांस बोलतां लागेल सुदर्शन ॥ ऐसें बलिष्ट भाषण तयांचें ॥ ४२ ॥ ऐशा लोकनायकांस जे न भजती ॥ त्यांची जाणावी विचित्र गति ॥ बाह्यांगें अंतर्निष्ट प्रचिती ॥ कैसी कळेल साधारणा ॥ ४३ ॥ परमामृत मुकुंद राजाचें, ॥ ओतप्रोत वेदांत साचें ॥ त्यापरी स्वराष्ट्र वेदांताचें ॥ पृथःकरण करावें ॥ ४४ ॥ आमच्या राष्ट्राचें

पंचीकरण ॥ हिंदुस्थानचा नकाशा जाण ॥ भूगोल दृष्ट्या जरी केलें पठण ॥ तरी तो देशाभिमान नव्हे ॥ ४५ ॥ स्वराष्ट्रदेवी प्राणप्रतिष्ठा शिकून ॥ बाणावा लागे स्वदेशाभिमान ॥ प्राचीन अर्वाचीन इतिहास जाण ॥ समजून घ्यावा राष्ट्राचा ॥ ४६ ॥ अन्वयाचा व्यतिरेक ॥ व्यतिरेकाचा अन्वय देख ॥ सूक्ष्म विवेचनाचे लेख ॥ मनन करावे ॥ ४७ ॥ सामाजिक औद्योगिक स्थिति ॥ राजकीय घ्यावी समजून चित्तीं ॥ शक्त्यनुसार येतां प्रचीती ॥ स्वदेशभक्ति बाणेल ॥ ४८ ॥ राष्ट्ररूप देह विवरितां अंतरीं ॥ राष्ट्रीयत्वाचें सामर्थ्य धरी ॥ तत्त्वज्ञानी राष्ट्रभक्त तरी ॥ यालाच ह्मणती ॥ ४९ ॥ एक राष्ट्रीयत्व कल्पना ॥ नव्हती ह्मणून परक्यांना ॥ आयतेंच फावलें जाणा ॥ हिंदुस्थान देशांत ॥ ५० ॥ स्थानदेवता वास्तुदेवता ॥ ग्रामदेवता कुलदेवता ॥ होती परी स्वराष्ट्रदेवता ॥ नव्हतीच पूर्वी प्रगट असी ॥ ५१ ॥ राजकीय कापट्याचें निरसन ॥ महाभारतांत केलें जाण ॥ यास राष्ट्रीय मुत्सदीपणाचें लक्षण ॥ तत्वज्ञानें पाहिजे ॥ ५२ ॥ आमच्या लोकांत एक आहे ॥ ज्यांत त्यांत धर्मरूप पाहिजे आहे ॥ "दर्यावर खारेंपाणी" नको आहे ॥ तेंच "समुद्रस्नान" ह्मणतां पाहिजे ! ॥ ५३ ॥ "स्थानि स्वराज्य" नको आहे ॥ "स्वराष्ट्रदेवी" पाहिजे आहे ॥ ग्रामदेवता-स्थान-वास्तुदेवता पाहे ॥ याच दृष्टीनें पूर्वापार ॥५४॥ राष्ट्रीय बुद्धि पोषक लेखणी ॥ न चालविली प्राचीन कवींनीं ॥ राष्ट्ररूप देहाचीं तत्वें विवरूनी ॥ आत्माच उरे असें न केलें ॥५५॥ ज्ञान आणि प्रेम वाढविणें ॥ हीं साधकांचीं सिद्ध लक्षणें ॥ राष्ट्रीयत्वांत हीं स्पष्टपणें ॥ कळत असती ॥ ५६॥ स्वराष्ट्रीयत्वा कारणें ॥ ठायीं ठायीं विचार करणें ॥ परमार्थाचीच चळवळ धरणें ॥ हें बरें नव्हे ॥ ५७ ॥ जे स्वतःचेंच सुख इच्छिती ॥ ते सदांच दुःखी असती ॥ दुसऱ्याच्या सुखानें सुख मानिती ॥ तेच सुखी राष्ट्रीयत्वें ॥५८॥ राष्ट्रीयत्वासारखी उपाधि ॥ निवांत आत्मनिष्ठता निरुपाधि ॥ या दोन गोष्टींतली समाधि ॥ तत्वज्ञ राष्ट्रभक्त जाणतसे ॥ ५९ ॥ वेळीं विचार भरपुर करावा ॥ एकांतांत अगदीं

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रं.क्र. ३३८

त्यागावा ॥ आत्मानंद झोंपेंत घ्यावा ॥ राष्ट्रानंद जागृतींत ॥ ६०॥ राष्ट्रदेवी तूं जें करण्यास लाविशी ॥ तेंच मी करीन अहर्निशीं ॥ लोक बरें वाईट ह्मणती त्यांशीं ॥ काय कर्तव्य माझें ? ॥६१॥ देवी तूं वसविशी तसा वसेन॥ हांसविलेंस तर मी हांसेन ॥ वदण्यास लाविशी तेंच वदेन ॥ हें सत्पुरुषाचें ब्रीदशील ॥६२॥ लाभ झाला तरी वाहवा ॥ हानि झाली तरी वाहवा ॥ कोणी जनकराय कुणी शुकबुवा ॥ परि दोघे महात्मे सारखे ॥ ६३ ॥ देवत्वें भक्तीचे सोहळे ॥ भोगिती करून राष्ट्रीयचाळे ॥ देव यांच्या संगें डुले ॥ आपलेंच गोडपण चाखाया ! ॥६४॥ चांगलें नेसला तो साधु नव्हे ॥ राजांच्या मर्जीतला संत नव्हे ॥ घरचा सुखी देशाभिमानी नव्हे ॥ असें मूर्ख मात्र ह्मणती ॥ ६५ ॥ राष्ट्रभक्त देशाभिमानींच जन्मले ॥ त्यागलें भोगलें कोणी हाल सोसले ॥ कांहीं थोर तळमळत राहिले ॥ हें पूर्वसंचित ह्मणावें ॥६६॥ एखाद्या राष्ट्रभक्ताच्या ठायीं ॥ कडकडीत वितराग दिसे कांहीं ॥ एखाद्या राष्ट्रभक्ताच्या ठायीं ॥ दारिद्र्य मुळीं खपेना !॥६७॥ प्रपंच साधून परमार्थ केला ॥ मोक्षास कोणता बाध आला !॥ राजासंगें प्रजाधर्म साधिला ॥ तो राष्ट्रभक्त नव्हे कीं ?! ॥६८॥ एकानें राष्ट्रीयत्व थोडें केलें ॥ दुसऱ्यानें काय अधिक केलें ? ॥ राष्ट्रभक्तांत हें पाहतां भलें ॥ समसारखे वंद्य सर्व ॥६९ ॥ सद्वस्तूची ओळख धरीं ॥ आणि स्वदेशाची प्रीति करीं ॥ या दोन संधीच्या मध्यंतरीं ॥ मोक्ष तुझा सच्चिदानंद ॥ ७० ॥ राष्ट्रीयत्व धरून जरी ॥ होसी दामोदर भांडारी ॥ वेदांताचा तूं अधिकारी ॥ शून्य वादावीण सहज होशी ॥ ७१ ॥ इतिश्री स्वराष्ट्रदेवी [illegible]तिष्टायाम् दामोदर विरचितायाम् स्वदेशभक्ति निरूपणं नाम प्रथमम् प्रकरणम् संपूर्णम् ॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥

## पद.

( भाव धरारे आपुलासा देव करारे—या चालीवर. )

देश स्मरारे ॥ आपुलेंसें राष्ट्र करारे ॥ धृ० ॥ ती कुलदेवता आह्मी पुजितों ॥ वास्तुदेवता स्थापुनि नमितों ॥ ग्रामदेवता मानुनि धरितों ॥ भाव पहारे ॥

आपुलेंसें राष्ट्र करारे ॥ देश स्म० ॥१॥ देहात्मा वेदांती वघती ॥ जगदात्मा ज्ञानी अवलोकिती ॥ राष्ट्रात्मा राष्ट्रात्मे स्तविती ॥ अलग न व्हारे ॥ आपुलेंसें राष्ट्र करारे ॥ देश० ॥२॥ स्वराष्ट्र देवी प्राणप्रतिष्ठा ॥ नूतन कलियुगिं करुनि वरिष्ठा॥ दामोदर भांडारी द्रष्टा ॥ साक्षी धरारे ॥ आपुलेंसें राष्ट्र करारे ॥ देश स्मरारे आपुलेंसें रा० ॥ ३ ॥

नम्रसेवक,

**दामोदर फटुबा भांडारी.**

August 1906.

# नामदार काशीनाथ त्रिंबक तेलंग याचें

# पद्यात्मक चरित्र.

## आर्या.

### जन्मवृत्तांत.

हीं आर्यभूमि मागें मुत्सद्दी शांत देशहितकारी ।
लोकहिताचा वादी ऐसाही राजनिष्ठ सुखकारी ॥ १ ॥
आर्यांत उपजला हा कुलदीपक काशिनाथपंत भला ।
देशाला भूषविलें वर्तन तें शुद्ध दावुनी सकलां ॥ २ ॥
झाला जन्म तयाचा सारस्वत गौड थोर विप्रगृहीं ।
मुंबानगरीमध्यें झाली देखोनि त्यासि तुष्ट मही ॥ ३ ॥
कंदर्पवाटिमध्यें[1] रामतनय बापुराय तेलंग ।
पुत्रद्वय त्या झालें कृष्ण दुजा काशिनाथ अव्यंग ॥ ४ ॥
बंधु त्रिंबकरायां दुसरा जो काशिनाथ तो त्यानें ।
दत्तक ह्मणूनि दिधला सुरगुरुपरि ज्यासि सर्व जग वाने ॥ ५ ॥
तैलम्रक्षण मस्तकिं बुद्धीला हित ह्मणूनि जे यांचे ।

---

१. कांदेवाडी.

The Right Hon. John Morley, State Secretary for India, who is looked up to, as a master and guide by the educated community in India, says:—"Study nature—live in the open—dont dream—act your part. You cannot separate a man into two portions. He has to go one way in his professional calling and another in politics ( if he takes interest in it). Of course, every man is bound to take an interest in politics ; I for my part go further : I think every woman is bound to take an interest in politics ! and I know many, who do it, and to good purpose."

पूर्वज नित्यस्नानीं करिती 'तैलांग' नाम हें त्यांचें ॥ ६ ॥
मस्तकिं वा सर्वांगीं कोंकणजन हे अझूनही वरिती ।
तैलाभ्यंजन परि हें पूर्वी तैलंग यत्नतः करिती ॥ ७ ॥
'तैलांगा' पासुनि हा होय अपभ्रंश तोचि 'तेलंग'।
तद्ग्रामनाम पूर्वीं होतें ह्मणती कितेक 'तेलंग' ॥ ८ ॥
सत्राशें बाहत्तरिं शाकाब्दीं जन्मअष्टमी दिवशीं ।
झालें जन्म सुवर्तन तेजहि बाल्यीं दिसेचि जेविं वशी ॥ ९ ॥
त्या तैलबुद्धिवरुनी 'लौकिक मोठा मिळेल या जगतीं'।
कोणालाही वाटे विद्यागुरु तुष्टही तया प्रगतीं ॥ १० ॥
जी कल्पना गुरूंची होती तिजहूनि प्रत्यया आली ।
शाळेंत शिष्य जेथें तेथें गुरु होय तो जया काळीं ॥ ११ ॥
संस्कृत प्राकृत इंग्लिश भाषा कर जोडुनी उभ्या होत्या ।
वक्ता बृहस्पतीसम गहन विचारी असा दिसे श्रोत्यां ॥ १२ ॥
श्रीमुख बघतां त्याचें पहिल्यानें प्रेक्षकास ये भास ।
कीं आह्मांपरि साध्या पदवीचा नर नसेचि हा खास ॥ १३ ॥
अभ्यासक्रम झाला विविध परीक्षा सरोनि ज्या काळीं ।
ती ज्ञानार्जनरीती पडली न कदापि मृत्युच्या जाळीं ॥ १४ ॥

---

१ जान्सन हा, बर्कविषयीं ह्मणत असे कीं, जर एखाद्या मनुष्यास पावसानें गांठून तो व बर्क एखाद्या ठिकाणीं आडोशास उभे राहिले, तर तितक्या थोड्या वेळांतही, बर्क हा कोणी लोकोत्तर पुरुष असावा, (ओळख नसतांही त्याला नमस्कार......ह्मणावें) असें त्याला वाटेल.

One of the very first things that must strike the observer of this man (Telang) is, that he was very unlike to any other man.

*Justice Ranade.*

पदव्यांहुनी तयांना विद्येचा ध्यास फार तो होता ।
ग्रंथावलोकनानें प्रकृति बिघडतांहि नाद तो मोठा ॥ १५ ॥
पदवीधर झाल्यावरि पुस्तक झांकूनि ठेविलें बहुतीं ।
धनलुब्धि भोगमर्मी पारि यांहीं सेविलीं सदा बहु तीं ॥ १६ ॥
स्वमनाला आत्म्याला त्यांनीं शिक्षण दिलें खरें शुद्ध ।
धर्मविचारें वाचन करुनि तईं वानिती बहू वृद्ध ॥ १७ ॥
त्यां आत्मशिक्षणाची उपमा साजे न अन्य कोणाला ।
त्यांच्याविणें दुज्याला जाणविती शब्द हेच तोंडाला ॥ १८ ॥

## सार्वजनिक हितसंबंध.

निजरक्तबिंदु द्यावा शेवटचा आपुल्याच देशाला ।
रणक्रंदन ना करितां शांतपणें वाढवोनि पेशालो ॥ १९ ॥
राष्ट्रियसभा तरूचें पहिल्यानें बीज पेरिलें यांनीं ।
जनमन जागृत केलें राहुनियां राजनिष्ठ नर त्यांनीं ॥ २० ॥
उथळ जलासम त्यांची चळवळ नव्हती स्वदेशकार्यांत ।
निज इष्ट हेतु साधुनि भरविति देशाभिमान आर्यांत ॥ २१ ॥
पंडित थोर तयानें राष्ट्रिय-तरु-अंकुरास तेजविलें ।
तें शांतिबीज रुजुनी वाढतसे आज झाड हें पहिलें ॥ २२ ॥

---

१. श्रीपाद बाबाजी, घनश्याम नीलकंठ नाडकर्णी, ग. कृ. भाटवडेकर, रा. वा. टिळू, अंबालाल साखरलाल, जमशेटजी आ. दलाल, गोकुलदास काहानदास पारख, सी. वि. पटवर्धन हे तेलंगांचे सहाध्यायी होते. ही सर्व मंडळी लौकिकवान् आहे.

२ It is the duty of all patriotic citizens to be willing to shed the last drop of their blood for their country.

*Lord Curzon.*

राजप्रजामतांला दुष्कर संतुष्ट ठेवणें उभयां ।
तेलंगांसम * कोणी मुत्सद्दी निपजती क्वचित् समया ॥ २३ ॥
स्वपरपरित्राणाचें ब्रीद सदा वाळगीत ते गूढ ।
कळकळ तीहि विलक्षण खळखळ नसतांचि चालवी रूढ ॥ २४ ॥
त्यांची खुबी निराळी कोणाहि न साधते तशी शैली ।
दिसतें तसें न वाटे परिणामीं लाभते वरी थैली ! ॥ २५ ॥
उन्नतिसाठीं जिकडे चळवळ होईल तो असेच गडी ।
चोंहिकडे कामिं पडे प्रमुखपणा घ्यावया सभा पकडी ॥ २६ ॥
झालीं कामें बहुतचि त्यांच्या झटण्यामुळें स्वदेशांत ।
'हेमंतोत्सव'† ऐशा झाल्या शाखा वहु प्रदेशांत ॥ २७ ॥
वक्तृत्वखुबी त्यांची डुलवी शत्रूसही सभेमाजी ।
वादविवादी बुद्धि झाली मोठी प्रगल्भ त्यांमाजी ॥ २८ ॥
त्यांचें पहिलें भाषण बावीस वयांत जाहलें मान्य ।
वठलें तें इतुकें कीं आलें सर्वांत त्यासि प्राधान्य ॥ २९ ॥
'स्थानिस्वराज्य' याचें तेलंगांनींच बीज पेरियलें ।
त्या वेळीं जन वदले ऐक्यमत जनीं तधींच तें शिरलें ॥ ३० ॥

---

* सद्वर्तन कर्ते बापट शास्त्री तेलंग साहेबांस बावन्नकशी सोनें ह्मणून सोन्यास सुगंध नव्हता असें पुस्तकांत लिहितात.

† बत्तीस वर्षांपूर्वी स्वदेशी मालाचा व्यापार करणारी मंडळी लिमिटेड मुंबई, ही १८७३ मध्यें ना० तेलंग, म. चि. आपटे, नी. दप्तरदार इ० प्रमुखांनीं देशी माल वापरावा या हेतूनें रामवाडीच्या नाक्यावर स्थापिली होती; ती अद्याप चालते.

उत्तम सर्वांत असें भाषण त्यांचेंच एकदा झालें।
एका महाप्रसंगीं पाश्चात्य श्रेष्ठही बहू धाले ॥ ३१ ॥

**धंदा, उत्कर्ष.**

झाले वकील मोठे मुद्दे-भाषण तसें असामान्य।
निज पक्षकारतर्फे त्या योगें जाहले अखिलमान्य ॥ ३२ ॥
अत्यंतविकट वादीं आला जयलाभ त्यांस तो जबर।
मानवले अधिकारी होउनि मर्जी बहाल त्यांजवरे ॥ ३३ ॥
तद्विषयीं आंग्लजनीं झाली बहु पूज्यबुद्धि बुद्धिमतीं।
वादग्रस्तीं धर्म-प्रकरणिं तद्वत्त-निर्णया स्तविती ॥ ३४ ॥
'न्यायसभेमाजी या होइल ही न्यायमूर्ति सत्य निकीं,'।
त्यांहीं भविष्य केलें झालें ही सत्य शीघ्र मग लोकीं! ॥ ३५ ॥

---

१. अशा भाषणांपैकीं इ० स० १८७३त मिठाच्या कायद्याच्या खर्ड्याविरुद्ध. (२ रें) सिव्हिल सर्विसमध्यें अधिक देशी लोक घ्यावे याविषयीं. (३ रें) घरें बांधण्याच्या म्युनिसिपालिटीनियमाविरुद्ध. (४ थें) लार्ड लिटनकारकिर्दीत लायसन्सटॅक्सविरुद्ध. (५ वें) १८७९ त मांचेस्टरमालावरील जकात कमी करण्याबद्दल लोकांस उत्तेजन करण्याच्या संबंधानें. (६ वें) १८८३ त सर्वांत उत्तम असें इलबर्टबीलप्रसंगीं भाषण झालें, या वेळीं असा वक्ता हिंदुस्थानांत नसेल अशी युरोपीयनांत आख्या झाली! (७ वें) १८८४ त लार्डरिपन्प्रयाणप्रसंगीं. तसेंच इ० स० १८८५त पहिल्या राष्ट्रीयसभेस, १८८८ त अलाहाबादकॉंग्रेस, तसेंच गव्हर्नर सर रिचर्डटेंपलनें टाउनहॉलांत सभेला जागा दिली नाहीं ह्मणून उइलसन सर्कसच्या अवाढव्य तंबूंत लायसन्स टॅक्सविरुद्ध अस्खलित बोलले त्या वेळीं तेज विलक्षण पडलें. याशिवाय मराठींत त्यांचीं मोठमोठीं भाषणें झालीं.

२. माणकुवरबाई खटला १८७५ त.

तें अखिल आर्यमंडळ झालें आनंदमग्न त्या पायीं ।
गणगोत्र इष्ट त्यांचे काका भाऊ पिता तसी आई ॥ ३६ ॥
पदवीधर मुकुटमणी झाले ते नामदार तेलंग ।
'पंडितरायें गुरु' असे संस्कृत महाराष्ट्र आंग्ल बहुरंग ॥ ३७ ॥
न्यायाधीशपणास्तव ना हटले मुत्सदीपणीं स्वल्प ।
होतें सहाय त्यांचें देशहिताला वरेंच ना अल्प ॥ ३८ ॥
मोठें व्हावें ऐशी इच्छा नसतांच जाहले मोठे ।
साधें वर्तन ठेवुनि लोकोत्तर कृत्य दाविलें मोठें[२] ॥ ३९ ॥
ती भाषा परक्यांची करणें आह्मांस आपुली लागे ।
पदवी वरिष्ठ पावुनि लाभे जगमान्यता तया मागें ॥ ४० ॥

## स्वभाव मत इ०.

त्यां श्रेष्ठ योग्यतेचा मानाचा कोणताही गर्व नसे[४] ।
आत्मस्तुति सहन नसे अंतःकरणांत तोच भाव वसे ॥ ४१ ॥

---

१ Vice-Chancellor of the University C. I. E.

२ "येन केन प्रकारेण, प्रसिद्धः पुरुषो भवेत्"–असलें यांना आवडत नसे.

३ "ही–गणितशास्त्राची परीक्षा मराठींत चालली असती तर, श्रीयुत रघुनाथ पुरुषोत्तम परांजपे पहिलाच येऊन दुसऱ्या युरोपीयन सीनियर ऱ्यांगलरास थंड बसावें लागलें असतें," असें केंब्रिजच्या विद्यागुरूनें भरसभेंत ह्मटलें. यावर्षी तंजावरचे त्यगराजन २ रे रेंग्लर झाले आहेत. ( विलायतेस न जातांही छत्रे, दिनानाथ दळवी इ० गणितांत प्रसिद्ध आहेत.)

४ God has so arranged matter that which lives long also takes long to grow. We talk of "Simple Life" as if it were very easy to lead. No doubt the expression "Simple Life" is very enchanting and comparing ourselves with people of Europe whom we find to be always

त्यां आपलेपणाचा बाणा बहु राखण्यांत लक्ष्य असे ।
ग्रामस्थी पागोटें अभिमानें लेइती स्वतात जसे ॥ ४२ ॥
सर्वस्वीं निर्व्यसनी सात्विक-आहारनिष्ठ जे ऐसे ।
प्रकृति उदारचि मोठी वडिलां सन्मान नम्र ही तैसे ॥ ४३ ॥
विद्यार्थ्यां धनहीनां द्रव्यद्वारा सहाय ते करिती ।
प्रतिमासिं नित्य नियमें सद्व्यय संस्थेंत सद्यशा वरिती ॥ ४४ ॥
जो कर्ममार्ग त्याहुनि भक्तीचा मार्ग सुलभ त्यां वाटे ।
त्यांना प्रियतम तिसरा ज्ञानाचा धरिति साधु जे मोठे ॥ ४५ ॥
प्राक्तन-वादी नव्हते 'चातुर्याचा प्रभाव सर्व करी' ।
ऐसें तयांस वाटे 'यत्नचि तो सर्व दैन्यताप हरी' ॥ ४६ ॥
त्यांचा स्वभाव नव्हता पक्षग्रहरूप हट्टवादाचा ।
सर्वांत सार आहे त्यांना वाटे न अंश वादाचा ॥ ४७ ॥
त्यांच्यासम अल्पवयीं ऐसी पदवी न लाभली कोणा ।
हल्लींच्या मन्वंतरिं भारत तरुणांत हाच नरराणा ॥ ४८ ॥

---

after wealth and the comforts of the world, we pride ourselves on the simplicity of our life....For simplicity does not consist in putting on a dhotir and leading careless, meagre and unmeaning lives. If fewness of wants were a test of simplicity, barbarians would be the simplest of human beings on earth. But if simplicity means godliness as I presently intend to show to you it does, then you will admit that such lives are not easy to lead. They mean an effort of supreme magnitude and cultivation of our faculties in no small measure. A simple life means a strenuous and therefore a religious life which must spread its influence quietly yet surely on all who come in contact with it.

*Justice Chandavarkar in 2nd Anniversary.*
*of Bandra Prayer Union.*

कर्तव्य सर्व करुनी चाळीशी लागली न तों गेले ।
निजधामीं परलोकीं आप्तसुहृन्मित्र दूर ते केले ॥ ४९ ॥
गेले ह्मणूनि कळलें विद्वन्मणि सुनयमूर्ति तेलंग ।
मुंबापुर हळहळलें मोकलुनी धाय टाकुनी अंग ॥ ५० ॥
यांची स्मशानयात्रा केली त्या नागरिक सुलोकांनीं ।
जमुनी जातिचतुष्टय ऐकावी काय वेळ ती कानीं? ॥ ५१ ॥
जन सर्व त्यांस रडले हिंदु मुसल्मान पारसी गोरे ।
कवि सुज्ञ फिरंगी तो रडला उद्गार काढुनी जोरें[1] ॥ ५२ ॥
तेलंगयोग्यतेचा नर उपजाया कठीण वहु आतां ।
न्यायचिकित्सक पंडित जगमित्र तसा बहुश्रुत पहातां ॥ ५३ ॥
पुत्रचि सरस्वतीचा झाला सारस्वतांत दिव्य मणी ।
अटपुनि अल्पवयीं तो वार्धक्याचेंहि कार्य आर्यजनीं ॥ ५४ ॥

### ग्रंथलेखन.

संस्कृत प्राकृत इंग्लिश तीन्ही भाषांत लेख बहु रचिले ।
पुस्तक निबंध उत्तम पत्रांतहि फार काल ते लिहिले ॥ ५५ ॥
होमर् ग्रंथावरुनी रामायण जाहलें असें कोणे[2] ।
लिहिलें त्याचें खंडन केलें बांधुनि तयास दांव्यानें ॥ ५६ ॥
गर्व त्याज्य खरा तरी सत्याच्या मंडनीं करी रूप ।
सर्प त्रासें फूं करि वन्हिस्पर्शें सुवास दे धूप ॥ ५७ ॥

---

१. Ah ! levou o tumulo um orador inclyto,
Ah ! levou um patriota afferrado, (*Telang*)
Roubou uma intelligencia robusta
Faltando sempre a nossa querida India.

२. जर्मन प्रोफेसर डॉ. वेवर ( या शार्मण्य पंडिताविषयीं निबंध त्यांनीं आपल्या गीतेच्या प्रस्तावनेस जोडला ).

श्रीमद्भगवद्गीता केली बैबलवरूनि हें दुसरें ।
पाश्चात्य पंडितानें शोधुनि विद्वत्त्व दाविलें कुचरें ॥ ५८ ॥
त्याच्याहि पारिपत्या वादुनि पाडावया न ते डरले ।
किंबहुना बैबल हें गीतेवरुनीच जाहलें ठरलें ॥ ५९ ॥
जे गौरकाय इंग्रज त्यांनीं तोंडांत घातलीं बोटें ।
हा वाद सर्व पाहुनि वदले 'कीं हें खरेंच, ना खोटें' ॥ ६० ॥
शाश्वत कृत्यें तयांचें भाषांतर काव्यबद्ध गीतेचें ।
जगमान्य लेखणीचें त्रिविधजनां वंद्य सार नीतीचें ॥ ६१ ॥

## उपसंहार.

स्वपरहितबुद्धिनें जो शांतपणें सत्यधर्मआधारें ।
राष्ट्रानें हित पाही तोच महात्मा खरा गुणाधारें ॥ ६२ ॥
जो कल ठेवी अपुला सत्यासाठीं तसा प्रभूसाठीं ।
किंवा देशासाठीं चोंही बाजूंनि त्यास यश गांठी[2] ॥ ६३ ॥
क्षणभंगुर हें कितितरि मानवजीवित असेच भूलोकीं ।
मुख्यत्वें बहु ज्याला आशामय दृष्टिनें जन विलोकी ॥ ६४ ॥

---

१. स्थानिक स्वराज्य, शहाणा नेथन, शास्त्र व रूढि यांच्या बलाबलाविषयीं विचार, सामाजिक विषयाची तोडजोड, मोक्षमुल्लरकरितां गद्यात्मक महाभारतां-तील भाग, भर्तृहरीशतकटीपा, रॉयल एशियाटिक सोसायटीमध्यें निबंध वाचिले, त्यांत चालुक्य, कदंब, सिलहर यांचें वर्णन ताम्रपटाधारें केलें इ० इ० पुष्कळ लेख आहेत.

२ Let all the ends thou aimest at,
Be thy country's, thy God's and truth's.

विलगुनि आह्मी असतों आशातंतूस यापरी चित्तीं ।
करुनी प्रसन्न मन हा येतो कीं सुदिन आमुच्या हस्तीं ॥ ६५ ॥
काल्पनिक मनोराज्यें या प्राण्याच्या जिवावरी करितों ।
सर्वांच्या भाग्याला कारण त्याचा प्रयत्न हें धरितों ॥ ६६ ॥
ज्याचें कर्तृत्व जनीं दुर्दिन अस्तास नेउनी आणी ।
सुदिनोदय देशाला काळ तयावर कुठार कीं हाणी ॥ ६७ ॥
पडतां उडी यमाची अमुचें उद्दिष्ट कल्पनाराज्य ।
जाई उडोनि गगनीं दुःखाग्नीमाजि होय कीं आज्य ॥ ६८ ॥
भूमीस भार जे जे त्यांस चिरंजीव ठेवितो काळ ।
रखडत भूपृष्ठावरी खडखडित सदा जरीहि दुष्काळ ॥ ६९ ॥
खचित मनाची खात्री होते कीं नष्टचर्य देशाचें ।
ना संपलें अजूनी येती घाले अशाच वेशाचे ॥ ७० ॥
विद्वान् भर तारुण्यीं अर्धायुष्यांत हा! कसे सरती ? ।
याला कांहीं कारण सबल दिसेनाचि या महीवरती[1] ॥ ७१ ॥
विद्वान्स होउनी जे देशास्तव हातपाय हालविती ।
व्यायामासाठीं ते बुद्धया नच हातपाय चाळविती ॥ ७२ ॥
चौसष्ट कलाभूषित दीर्घायु द्वीपजन कसे पाहा ।
जे व्यायामें नियतें सेविति आयुष्यदीर्घता आहा! ॥ ७३ ॥
यांच्या अपमृत्यूनें झाली बहु हानि आर्यदेशाची ।
न भरुनि येई सत्वर इच्छा कैसी असे परेशाची? ॥ ७४ ॥
निजथैथयाट दावुनि वसुधा जी रंगभूमि इजमाजी ।
देशाभिमान रक्षुनि झाला कीं राजनिष्ठही गाजी ॥ ७५ ॥

---

१ **"पदवीधरांचा अपमृत्यु"** (Premature death of Graduates) ही माझी कविता ( साक्या ) वाचावी.

वक्तृत्व सुदर्शन तें मुद्यांची मालिका असीं शस्त्रें ।
धरुनी जनमन जागृत केलें विद्वत्सभारणीं शास्त्रें[1] ॥ ७६ ॥
त्यांच्या वाणीमध्यें शब्दनिरर्थक न एक अक्षरही ।
ज्या त्या शब्दीं स्पष्टचि त्यांची मर्मज्ञता दिसे वरही ॥ ७७ ॥
एखाद्या श्रोत्याला आलें जरि विघ्न ऐकण्यामध्यें ।
'गेलें व्यर्थ अहा !' अशि हळहळ वाटे जिवा क्षणामध्यें ॥ ७८ ॥
स्पर्धा चालत असते राजा आणि प्रजांमधें सतत ।
स्वश्रेष्ठत्वाविषयीं किंवा जे स्वाधिकार त्यां जपत ॥ ७९ ॥
हक्क* जनांचा मागे राजाशीं राजनिष्ठ भक्त खरा ।
मोठ्या प्राज्ञपणानें निस्पृह तेलंग जो नसे भितरा ॥ ८० ॥

---

१ Telang's memorial Town Hall meeting, Lord Harris the Governor of Bombay presiding, Hon. P. M. Mehtha said:—Mr. Telang and I enlisted ourselves, raw and humble recruits, in the public cause, and appeared in this very Hall to do battle, according to our lights at a public meeting held under the presidency of one of your Lordship's predecessors. Many have been the occasions since then on which Mr. Telang has appeared on this very platform, as not a few of those present here may remember his handsome and intellectual face, beaming with intelligence and kindliness and spirit and instructing us with his thoughtful and cultured eloquence, his sound and judicious wisdom, his firm and temperate advocacy of the public interests.

( *Applause.* )

*Our numbers are so great that no power on earth can bar our way for any length of time, if only we are true to ourselves ( cheers. ) Our love of the mother land must grow so fervent and passionate that it will turn all sacrifice for India into a pure joy (cheers). What the

विद्वत्सभेंत पाहुनि गुण हे प्रतिपक्षि पाश्चिमात्य नर ।
'हिंदुस्थानांत असा वक्ता न मिळेल' बोलले प्रचुर ॥ ८१ ॥
यांच्या संबंधानें आशा होती बहूत लोकांना ।
परि जें विरजण पडलें 'हिंदू-दुर्भाग्य' हें ह्मणा कां ना? ॥ ८२ ॥
बुद्धीसंगें सद्गुण असला हिंदूंत पाहिजे खास ।
कीं रानटीपणाचा दोष न यावा कृतीमधें त्यांसे ॥ ८३ ॥
बोले त्याचप्रमाणें साधन अनुकूल सर्वथा नाहीं ।
दिसतें संप्रति जैसें वाटे तेलंग यांसही पाहीं ॥ ८४ ॥
पाया जुनाट धरुनी चिकटावें आणखी पुढें व्हावें ।
सगळेंच न गाळावें प्रतिसृष्टि करावया नव्या भावें ॥ ८५ ॥

---

situation requires is not new ideas, but sacrifice—not talk but work—work early and work late, work when it is dawn and work when it is dark; what we need today above every thing else, is, a band of workers; who will give up their all for the country and spread the gospel of unity and patriotism, far and wide throughout the land. None knows what the future has in store for us, or how much fulfilment our own eyes may witness before they close. But one thing is quite clear: There is nothing in this world of ours which may not be achieved by men, whose lives are inspired by patriotism sustained by faith and ennobled by sacrifice (cheers). India expects that such men shall now come forward in sufficient numbers in her service. If this expectation is realized all else will be well.

*G. K. Gokhle in England. 5th May 1906.*

१ "The other fact which I would impress upon you is that intellect is not everything. Intellect does not govern the world. Character should be your aim."

Justice Candy.

'सगळें जुनेंच खोटें' ह्मणणाऱ्याला जबाब तोच मिळे ।
'नूतन सगळें खोटें' मानसिक विकार तोच एक खिळे ॥ ८६ ॥
पूर्वज यांचें गौरव तेलंग करीत फार व्याख्यानीं ।
श्रोत्यांनीं वाचावें जें कांहीं आढळेल आख्यानीं ॥ ८७ ॥
'नाहीं वाटत कौतुक पूर्वजकृत्यीं कदापि ज्यां कांहीं ।
त्यांना कैंची चिंता केलें जरि कांहिं वंशजीं पाहीं' ॥ ८८ ॥
येतें यश कामाला कर्ता हिंमत धरील योग्य तरी ।
अपशकुन मांजरांचा कांहीं कार्यास बाधही न करी ॥ ८९ ॥
कल्याण इच्छिणारा घेतो ' बरवें ' ह्मणून जगतमुखें ।
युद्धाचें यश त्याला अजिंक्य पत्रें न लागती प्रमुखें ॥ ९० ॥
एका पक्षीं 'बरवें' होतें 'वाईट' तें दुज्या पक्षीं ।
सत्पुरुष सर्वसाक्षी नगणी 'बरवें' अशापरी लक्षी ॥ ९१ ॥
हा गुण ध्यायाला जरि नाहीं कोणीच आज आढळला ।
निपजेल कधींहि तरी सत्कार्याला कधीं न जो ढळला ॥ ९२ ॥
आर्यावर्तामधुनी गेले बहुतेक पुरुष थोर असे ।
तेलंगयोग्यतेचे अल्पायुष्यांत दिव्यचंद्र जसे ॥ ९३ ॥
'एक मरे कीं त्याचा शोक दुजा वाहतो मनीं जोंहीं' ।
श्रीरामदास ह्मणती 'जाय अकस्मात् तयापुढें तोही !' ॥ ९४ ॥

---

१ बर्क याची उक्ति घेऊन नामदार तेलंग हेमंतोत्सवांत ह्मणाले— "Those who do not look backward to antiquity will not look forward to posterity." "ज्यांना आपल्या पूर्वजांनीं काय केलें याची पर्वा नाहीं, त्यांना आपल्या वंशजांचें काय होईल याची पर्वा नसणारच. (टाळ्या.)

२ Courage in large politics is the true common sense.

*J. Morley ( at Forfar 1905,)*

अतितीव्रबुद्धि सज्जन उपजे त्या देव नेतसे वेगें ।
न जणों भय त्या वाटे होई स्वसमान हा बहू वेगें[१] ॥ ९५ ॥
हेंच उदाहरण दिसे संप्रति आर्यप्रबुद्धवर्गांत ।
कीं धर्मबीज रुजतां दूत तया बोलवीत स्वर्गांत ॥ ९६ ॥
बहुदीर्घ वांचला जरि जरि केलें अमित शुद्ध देशहिता ।
तरि आर्य हा वियोगें अल्पायू मानितों अह्मीं स्वहितां[२] ॥ ९७ ॥
मोहक भाषाशैली सभ्यपणा सरळता निगर्विपणा ।
थोरांनीं वर्णियला तेलंगांचा सभेंत थोरपणा ॥ ९८ ॥
'या कर्त्या पुरुषाच्या बरोबरीनेंच काम करण्याला ।
पात्र न आह्मीं'-वदले न्यायाची मूर्ति रानडे त्याला ॥ ९९ ॥
'या कर्त्या पुरुषाची कांस धरोनीच सर्व जाणारे' ।
ऐसेंही ते वदले **माधव गोविंद रानडे** सारे ॥ १०० ॥
पुण्यतिथिनिमित्त सभा भरवुनि उद्गार काढिले त्यांनीं ।
प्रतिबिंब सावली ती दाखविली स्पष्ट या महात्म्यांनीं ॥ १०१ ॥
तें श्रोतृवृंद केलें तल्लीन सजीव या चरित्रानें ।
तेलंगनिधनतिथिला '**हिंदू युनियन् क्लबांत**' मित्रानें ॥ १०२ ॥

---

१ शिरोलेख इंग्रजी पहावा.

२ Though a great man dies full of years and full of honors, yet, I must even now say, that it is a premature death. It is a death our human eyes will regard as premature; because we had fondly hoped that, in whatever position he was placed by the weight of his character, by the splendour of his talents, by the purity of his virtues, he would still have been spared to render to his country the most essential services.

*Gladstone.*

सर्वांचेंच* असे जें नित्याचें कार्य तें न कवणाचें ।
जें कार्य अमानुष तें अनुकरणाला दिसेल सर्वांचें ॥ १०३ ॥
निधनतिथिनिमित्त तरी सत्पुरुषाचें चरित्र तें गावें ।
प्रतिवर्षस्मारक§ हें आर्यसमूहीं प्रसिद्धही व्हावें ॥ १०४ ॥
**दामोदर भांडारी** सांसारिक लोक फार आसक्त ।
यास्तव प्रपंच साधुनि व्हावें "तेलंग" नेम हा सक्त ॥ १०५ ॥

**समाप्त.**

---

अहं राष्ट्री सङ्गमनी वसूनां चिकितुषी प्रथमा यज्ञियानाम् ।
तां मां देवा व्यदधुः पुरुत्रा भूरिस्थात्रां भूर्या वेशयन्तीम् ॥ ३

**ऋग्वेदसंहिता अष्ट. ८, अ० ७, वर्ग ११. ऋ. ३.**

**भावार्थ**—मी राष्ट्रोन्नतिकारक शक्ति आहें. ब्रह्मचारी, लोकांचें रक्षण करणारे व धनिक लोक यांच्यांत स्नेहभाव वाढवून त्या सर्व लोकांमध्यें माझे जे परमभक्त असतात त्यांना मी धन प्राप्त करून देतें. माझ्यासाठीं जें जें कांहीं करावयाचें असेल तें तें सर्व सर्वांनीं योग्यवेळीं केलेंच पाहिजे. कारण, मी सर्व राष्ट्रीय उपास्यांमध्यें मुख्य उपास्य आहें. माझ्या भक्तीनेंच जनतेचें कल्याण होतें. मी सर्वत्र असून अनेक मनुष्यांमध्यें जेव्हां एकदम एक विचार उत्पन्न होतात तेव्हां त्या सर्व मनुष्यांमध्यें एकप्रकारचा विलक्षण आवेश उत्पन्न करितें. ह्मणूनच सर्व देशांतील विद्वान लोक माझीच भक्ति करीत असतात.

**( राष्ट्रीसूक्त. )**

---

* Everybody's work is no body's work.

§ See Mr. Justice Telang's Biography by Sir Raymond West, L.L.D

# तेलंगचरित्राच्या पहिल्या आवृत्तीवर अभिप्राय.

Opinion of Professor R. G. Bhandarkar, M. A., PH. Dr. Ex-Vice-Chancellor of the University, L. L. D.

"These verses composed by Mr. Damodar P. Bhandare, are on the whole very good and readable."

( ह्या आर्या एकंदरीत चांगल्या वाचण्यासारिख्या झाल्या आहेत. )

*18th August 1899.* (Sd.) R. G. BHANDARKAR.

---

तेलंगवर्णन.—या लघुकाव्याचा विषय स्तुत्य, काव्यरचना सरळ, योग्य विचारांनीं भरलेली, आणि एकंदरीनें मनोहर अशी आहे; यास्तव या आमच्या नूतन दामोदर कवीचें मी अभिनंदन करितों. यांनीं आपली कवित्वशक्ति न दाविता, दिवसेंदिवस सुधरून उत्तमोत्तम काव्यें करण्याची योग्यता तिला आणावी, अशी त्यास माझी अंतःकरणपूर्वक सूचना आहे.

मुंबई ता० ४ आगष्ट सन १८९९. } रामचंद्र भिकाजी गुंजीकर.

---

Vida de Telang—O Sr. Damodar P. Bhandare, filho de Goa e empregado da firma Ralli Brothers n'esta cidade, obsequia-nos com um exemplar do seu primoroso esboço biographico, em verso maratha, do finado distincto nunca assaz chorado filho da India K. T. Telang. Muito louvovel desejo.

*Anglo Lusitano.*

त्याचप्रमाणें भांडारे यांनीं रचिलेल्या १९०१ त पद्यात्मक रानडे चरित्रावर— प्रोफेसर रा. रा. भागवत, रावसाहेब वि. कों. ओक, सर भालचंद्र डाक्टर, रा. रा. काशीनाथ पांडुरंग परब यांचा व बालबोध इ० पुस्तकांचा व वर्तमानपत्रांचा चांगला अभिप्राय आहे.

REFBK-0000334
REFBK-0000334

पेंडसे आणि लाड यांच्या स्वदेशी छत्र्यांच्या कारखान्यांत निरनिराळ्या जातीच्या देशी छत्र्या, म्हैसूर प्लेंटर काफी, निलगिरी चहा, प्रसिद्ध भडोच सुजनी, नेपकीन्स, रुमाल, स्वच्छ केशर, कलकत्ता देशी कागद, पाकिटें, नोटपेपर्स, सुबक देशी दौती, टोप्या, पेनें वगैरे असून हे उत्तम स्वदेशी मालाचे घाऊक व्यापारी आहेत.

**मराठा एजन्सी—गिरगांव,**

**मोहनबिल्डिंग्स.**